**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार, दिनांक ०७ एप्रिल २०२४**

**ठळक बातम्या**

1. **केंद्रीय निवडणूक आयोगाद्वारे महाराष्ट्रात धर्मेंद्र एस गंगवार यांची सामान्य विशेष निरीक्षक आणि एनके मिश्रा यांची पोलिस विशेष निरीक्षक म्हणून नियुक्ती.**
2. **महायुतीच्या प्रचारार्थ उद्या चंद्रपुरात भाजप नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा.**
3. **मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी चंद्रपूर मतदार संघात 4 लक्ष 39 हजार 'मतदार माहिती चिठ्ठी' चे वाटप.**

**आणि**

4. **नागपुरसह संपूर्ण विदर्भात 11 एप्रिल पर्यंत वादळासह पावसाची शक्यता.**

*****

विशेष निरीक्षक महाराष्ट्र

केंद्रीय निवडणूक आयोगानं, महाराष्ट्रासह सहा राज्यांसाठी सामान्य आणि पोलीस अशा दोन श्रेणींमध्ये विशेष निरीक्षकांची नियुक्ती केली आहे. महाराष्ट्रात सेवानिवृत्त सनदी अधिकारी धर्मेंद्र एस गंगवार यांची सामान्य विशेष निरीक्षक आणि भारतीय पोलिस सेवेतले माजी अधिकारी एन के मिश्रा यांची पोलिस विशेष निरीक्षक म्हणून नियुक्ती केल्याचं, आयोगानं जारी केलेल्या अधिसूचनेत म्हटलं आहे. हे विशेष निरीक्षक कर्मचारी, सुरक्षा दलं आणि मतदान यंत्रांवर देखरेख ठेवतील. ते स्वत: राज्य मुख्यालयात थांबतील आणि आवश्यकता भासली तर संवेदनशील आणि जिथे समन्वयाची गरज आहे अशा भागांना भेट देतील.

मोदी सभा-चंद्रपूर

चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदारसंघात महायुतीच्या वतीनं मंत्री सुधीर मुनगंटीवार यांना उमेदवारी देण्यात आली असून त्यांच्या प्रचारार्थ उद्या पंतप्रधान

नरेंद्र मोदी चंद्रपुरात जाहीर सभेला संबोधित करणार आहेत. चंद्रपुरात तब्बल दहा वर्षांनी भाजपचे ज्येष्ठ नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची निवडणूक सभा होणार आहे. उद्या दुपारी ४ वाजता शहराबाहेर मोरवा विमानतळाच्या बाजूला विस्तीर्ण 16 एकर परिसरात ही सभा आयोजित करण्यात आली आहे. हा संपूर्ण परिसर सुरक्षेच्या दृष्टीनं अधिक अनुकूल करण्यात आला असून सुमारे एक लाख लोक या सभेला यावेत या दृष्टीनं भाजप कडून नियोजन सुरू असल्याचं आमच्या वार्ताहरांन कळविल आहे.

मुख्यमंत्री पत्रकार परिषद

रामटेक तसेच यवतमाळ वाशिम हा लोकसभा मतदारसंघ शिवसेना मोठ्या फरकाने जिंकेल असा विश्वास मुख्यमंत्री आणि शिवसेनेचे नेते एकनाथ शिंदे यांनी आज नागपुरात प्रसारमाध्यमांशी बोलताना व्यक्त केला. पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत घेतलेल्या सर्व निर्णयांची दखल घेतली जाते कारण कार्यकर्ते तळागाळापर्यंत काम करतात असं देखील त्यांनी स्पष्ट केलं.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया

लोकसभा निवडणुकीत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाने महायुतीचं काम न करता तटस्थ राहण्याचा निर्णय घेतला आहे. अहमदनगर इथं काल झालेल्या निर्धार मेळाव्यात हा निर्णय घेण्यात आला. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाने लोकसभेच्या निवडणुकीसाठी महायुतीकडून शिर्डी आणि सोलापूरच्या जागेची मागणी केली होती, ती मान्य होत नसल्या कारणाने पक्ष तटस्थ राहणार असल्याचं सांगण्यात आलं आहे.

वंचित बहुजन आघाडी/प्रहार जनशक्ती

वंचित बहुजन आघाडीच्या वतीनं रामटेक लोकसभा मतदार संघातील अपक्ष उमेदवार माजी सनदी अधिकारी किशोर गजभिये यांना पाठींबा देण्यात येत असल्याचं एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे सांगण्यात आलं आहे.तर प्रहार जनशक्ती पक्षाने रामटेक नंतर आता अकोल्यातही काँग्रेस उमेदवाराला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला असून अकोला लोकसभा निवडणुकीत प्रहार जनशक्ती पक्ष, काँग्रेस उमेदवार डॉ.अभय पाटील यांना समर्थन देणार असल्याची माहिती,

पक्षाचे अकोला जिल्हाध्यक्ष कुलदीप वसू व महानगर अध्यक्ष मनोज पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

विकास ठाकरे रॅली नागपूर

नागपूर काँग्रेसचा बालेकिल्ला असून यंदा हा काँग्रेसचा गड आम्ही परत मिळवणार आहोत. विकास ठाकरे हेच नागपूरचे खासदार बनणार असल्याचा विश्वास काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस मुकुल वासनिक यांनी व्यक्त केला. इंडिया आघाडीतील काँग्रेसचे उमेदवार विकास ठाकरे यांच्या जन आशीर्वाद यात्रेअंतर्गत मध्य नागपुरातील नागरिकांशी नेत्यांनी संवाद साधला. महाराष्ट्र काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनीही संबोधन केलं. दरम्यान, आज सकाळी पश्चिम नागपुरात जन आशीर्वाद यात्रा काढण्यात आली. सकाळी आठ वाजता वंजारी माता मंदिर येथून यात्रेला सुरुवात झाली. तर सायंकाळी भांडेवाडी इथं जाहीर सभेचं आयोजन करण्यात आलं आहे.

राजू पारवे-रॅली

संसदेत गेल्यावर पर्यटनाच्या निमित्ताने अनेक उद्योग रामटेकमध्ये खेचून आणून स्थानिकांना रोजगार देण्याचा आपला संकल्प असल्याचा निर्धार तीर्थक्षेत्र अंभोराच्या साक्षीने करीत असल्याचं राजू पारवे यांनी सांगितलं. महायुतीचे रामटेक लोकसभा निर्वाचन क्षेत्राचे शिवसेनेचे उमेदवार राजू पारवे यांच्या उमरेड विधानसभा क्षेत्रातील जनसंवाद रथ यात्रेची सुरुवात काल अंभोरा येथील श्री चैतैन्येश्वर शिव मंदिर इथं दर्शन घेऊन करण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते.

'लोकनिर्णय महाराष्ट्राचा'

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण हिंगोली लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

'मतदार माहिती चिठ्ठी

चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाची निवडणूक पहिल्या टप्प्यात म्हणजे 19 एप्रिल रोजी होणार असून या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्याचे ध्येय जिल्हा प्रशासनानं ठेवले आहे. त्याचाच एक भाग म्हणून नागरिकांच्या घरापर्यंत पोहचून 'मतदार माहिती चिठ्ठी' चे वाटप प्रशासनाच्या वतीनं करण्यात येत आहे. जिल्ह्यासाठी 4 लक्ष 39 हजार 'मतदार माहिती चिठ्ठी' उपलब्ध झाल्या असून प्रत्येक विधानसभा मतदारसंघात सदर चिठ्ठी पोहचविण्यात आली आहे. ज्या क्षेत्रात मतदार माहिती चिठ्ठ्यांचे वाटप होते, त्या क्षेत्रात मतदानाची टक्केवारी वाढण्याची शक्यता असते. कारण आपले नाव मतदार यादीत आहे, याबाबत नागरिकांना खात्री होते. त्यामुळे 'मतदार माहिती चिठ्ठी'चे नियमित वाटप करा. तसंच अधिका-यांनी सुध्दा मतदारांपर्यंत माहिती चिठ्ठी पोहोचली की नाही, याची पडताळणी करावी, अशा सूचना जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी दिल्या आहे.

भारत आणि ऑस्ट्रेलिया हॉकी

ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर असलेल्या भारतीय पुरुष हॉकी संघाचा दुसरा सामना आज दुपारी पर्थ इथं झाला. या सामन्यात ऑस्ट्रेलियानं भारताचा ४-२ असा पराभव करत ५ सामन्यांच्या मालिकेत २-० अशी आघाडी घेतली आहे. पहिल्या सामन्यात देखील यजमान ऑस्ट्रेलिया संघानं भारतीय संघाचा ५ विरुद्ध १ गोलनं पराभव केला होता. पाच सामन्यांच्या या मालिकेतला तीसरा सामना पर्थ इथंच बुधवारी होणार आहे.

आयपीएल-क्रिकेट

इंडियन प्रीमियर लीग स्पर्धेत आज दोन सामने होणार असून पहिला सामना मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅपिटल्स या दोन संघांमध्ये मुंबईच्या वानखेडे स्टेडियम इथे दुपारी साडेतीन वाजता सुरू झाला. दिल्ली संघानं नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मुंबई इंडियन्सने २० षटकांत ५ गडी गमावून २३४ धावा केल्या. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा दिल्ली कॅपिटल्स संघानं ४ षटकांत १ गडी गमावून २४ धावा केल्या आहेत. दरम्यान दुसरा सामना

लखनौच्या एकाना सिटी इथल्या अटलबिहारी वाजपेयी स्टेडियमवर लखनौ सुपर जायन्ट्स आणि गुजरात टायटन्स या दोन संघांमध्ये रात्री साडेसात वाजता सुरू होईल.

हवामान

नागपुरसह संपूर्ण विदर्भात येत्या ११ एप्रिल पर्यंत वादळासह पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या दरम्यान सरासरी कमाल तापमान ३९ अंश सेल्सिअस तर किमान तापमान २४ ते २१ अंश सेल्सिअस इतकं राहण्याचा अंदाज आहे. ९ आणि १० एप्रिल साठी येल्लो अलर्ट जारी करण्यात आला आहे. विजेच्या कडकडाटासह वादळ आणि ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वारा वाहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. दरम्यान, गेल्या २४ तासांत नागपूरचं कमाल तापमान ४०.६ तर किमान तापमान २४.६ इतकं नोंदविण्यात आलं. पुढील काही तासांत अमरावती, वर्धा, यवतमाळ आणि नागपूर जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.

प्रधानसचिव ब्रिजेश सिंह व्याख्यान

विश्वेश्वरय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थेच्यावतीनं आयोजित 'कारवां' या साहित्य उत्सवात माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधानसचिव ब्रिजेश सिंह यांचं आज सायंकाळी ७ वाजता 'बाइट्सची लढाई: माहिती युद्धात भारताची भूमिका' विषयावर विशेष व्याख्यान होणार आहे. ब्रिजेश सिंह हे मुख्यमंत्री कार्यालयात प्रधान सचिव म्हणून कार्यरत आहे तसंच महाराष्ट्र शासनाच्या सायबर सुरक्षा संस्थेचे ते प्रमुख आहेत.

समृद्धी महामार्ग अपघात

समृद्धी महामार्गावर वाशीम जिल्ह्यातल्या शेंदूरजना उड्डाणपुला जवळ तीन वाहनांचा अपघात होऊन ३ जण जखमी झाले. लासलगावहुन नागपूरकडे कांदा घेऊन जाणारा ट्रक सकाळी साडेपाच वाजता उड्डाणपुलासमोर उलटला. त्यामुळे मागुन येत असलेल्या ट्रकनं अचानक ब्रेक दाबले. त्याचवेळी भरधाव वेगानं नाशिकहून नागपूरकडे द्राक्षं घेऊन जाणारी बोलेरो पिक गाडी अचानक थांबलेल्या ट्रकवर धडकली. गाडीचा चालक गंभीररीत्या जखमी झाला, तर ट्रक चालकालाही

किरकोळ जखम झाली.जखमीना समृद्धी महामार्गावरील रुग्णवाहीकेच्या सहाय्यानं नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

******